# भवानी भारतमाता


## (दुर्गा स्तोत्र आणि वन्दे मातरम् सहित)

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे

# भवानी भारतमाता

## (दुर्गा स्तोत्र आणि वन्दे मातरम् सहित)

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे



**श्रीमाताजी आणि श्रीअरविंद**
**यांच्या चरणी सविनय समर्पित**

❖

आवृत्ती : फक्त ई-आवृत्ती
प्रकाशक : ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे
प्रकाशन : २६ जानेवारी २०२५
पुस्तक क्रमांक : ०१
ई-मेल : editorabhipsa2018@gmail.com

आमचे  इतर प्रकल्प

फेसबुक : https://www.facebook.com/abhipsa.masik.5/

युट्यूब : https://www.youtube.com/@auromarathi682

संकेतस्थळ : auromarathi.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना..........................................................०६

दुर्गा स्तोत्र - प्रास्ताविक............................................०९

दुर्गा स्तोत्र..........................................................१०

श्रीअरविंदांच्या दृष्टिक्षेपातील अखंड भारत - (छायाचित्र).....१३

भवानी मंदिर - प्रास्ताविक..........................................१५

भवानी मंदिर......................................................१७

आचारसंहिता......................................................३४

वंदे मातरम् (बंगाली, इंग्रजी आणि मराठी).....................३९

**

# प्रस्तावना

क्रांतिकारक श्री. अरविंद घोष यांना अटक झाली तेव्हा देशबंधू चित्तरंजन दास यांनी त्यांचे वकीलपत्र घेतले होते. खटल्याच्या दरम्यान न्यायाधीशांसमोर अपील करताना त्यांनी श्रीअरविंदांविषयी जे उद्गार काढले ते प्रसिद्ध आहेत. ते म्हणाले होते, "हे सगळे वितंडवाद जेव्हा शांत झालेले असतील, ही सगळी धामधुम, ही सगळी आंदोलने थंड झालेली असतील, जेव्हा श्रीअरविंद देहरूपात नसतील तेव्हा 'देशभक्त कवी, राष्ट्रवादाचे प्रणेते आणि मानवतेचे प्रेमी' म्हणून ते ओळखले जातील. ते गेल्यानंतरही त्यांचे शब्द पुनःपुन्हा या भारतातच नव्हे, तर दूरदेशी आणि साता समुद्रापारही घुमत राहतील."

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही तिन्ही गुणवैशिष्ट्ये प्रतिबिंबित होतील असे विपुल लेखन आज उपलब्ध आहे. परंतु श्रीअरविंद विरचित दुर्गास्तोत्र, भवानी मंदिर आणि 'वंदे मातरम्'चा इंग्रजी अनुवाद यामधून ही वैशिष्ट्ये प्रकर्षाने दिसून येतात. तेव्हा वाचकांना या तिन्हीचा एकत्रित आस्वाद घेता यावा, या दृष्टीने प्रस्तुत पुस्तकाची मांडणी करण्यात आली आहे.

या तिन्ही रचनांमध्ये एक समान आशयसूत्र आहे. 'दुर्गास्तोत्र' या रचनेमध्ये श्रीअरविंद भारतमातेस दुर्गा-रूपात प्रकट होण्यासाठी आवाहन करतात, 'भवानी मंदिर'मध्ये ते तिला भवानी-रूपात पाहतात आणि 'वंदेमातरम्' या गीताच्या अनुवादाच्या निमित्ताने पुन्हा एकदा मातेच्या रूपात त्यांना भारतमातेचे दर्शन घडते.

'दुर्गास्तोत्र'मध्ये दुर्गेच्या रूपात प्रकट होण्यासाठी केलेले आवाहन ऐकून, जणूकाही भारतमाता श्रीअरविंद या तिच्या पुत्रासमोर प्रकट होते आणि त्याला आपली मनोव्यथा कथन करते, तिच्या प्रत्यक्ष प्रकटीकरणासाठी तिच्या पुत्रांनी काय केले पाहिजे हे कथन करते. भारतमाता आणि श्रीअरविंद यांच्यामधील हा संवाद 'भवानी-मंदिर'मध्ये शब्दबद्ध होतो. 'भवानी-मंदिर'मध्ये भारतमातेने दिलेली हाक तिच्या

पुत्रांमध्ये एक वेगळीच चेतना जागवणारी ठरते; त्यामध्ये व्यक्त करण्यात आलेली अपेक्षा जणू त्यांच्याकडून पूर्णत्वास जाते आणि सुजलाम् सुफलाम् असलेल्या भारतमातेचे तेजोमय, प्रसन्न मुखदर्शन तिच्या पुत्रांना पाहायला मिळते. आणि त्या सर्वांकडून उत्स्फूर्तपणे तिचे स्तवन मुखरित होते - वंदे मातरम् l वंदे मातरम् ll

अशा संगतीने या तिन्ही रचनांचे अध्ययन केल्यास श्रीअरविंद 'देशभक्त कवी, राष्ट्रवादाचे प्रणेते आणि मानवतेचे प्रेमी' म्हणून किती महान होते, याची प्रचीती येते.

वास्तविक याच मालिकेमध्ये समाविष्ट करता येईल असे श्रीअरविंद विरचित आणखी एक स्तोत्र म्हणजे 'भवानी-भारती'. ९९ श्लोकांचे हे संस्कृत स्तोत्र स्वतंत्रपणे आस्वाद घेण्यासारखे असल्याने त्याचा येथे समावेश केलेला नाही, हे येथे विनम्रपणे नमूद करावेसे वाटते.

पुस्तकाच्या निर्मितीमध्ये नाशिकचे श्री. अरुण खोंडे आणि पुण्याचे श्री. मिलिंद सबनीस यांचे साहाय्य लाभले, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

'ज्योतिर्मयी मिडिया हाऊस'तर्फे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

- डॉ. केतकी मोडक

**

# दुर्गा स्तोत्र

# प्रास्ताविक

श्रीअरविंद विरचित ‘दुर्गा स्तोत्र’ मुळात बंगाली भाषेत आहे. ते त्यांनी इंग्रजी भाषेत अनुवादित केले. ऑक्टोबर १९०९ मध्ये ते ‘धर्म’ या नियतकालिकामध्ये प्रकाशित करण्यात आले होते.

या मराठी अनुवादासाठी (CWSA) - The Complete Works of Sri Aurobindo च्या नवव्या खंडातील इंग्रजी दुर्गा-स्तोत्राचा संदर्भ घेण्यात आला आहे.

या स्तोत्राच्या माध्यमातून श्रीअरविंद भारतमातारूपी दुर्गा मातेस आवाहन करत आहेत. तिने या भूतलावर प्रकट व्हावे आणि आंतरिक व बाह्य शत्रूंचा नि:पात करावा, अंधकाराचा निरास करून प्रकाशाचे साम्राज्य विस्तारित करावे, यासाठी केलेले हे आवाहन भारतमातेच्या पुत्रांमध्ये एक नवी चेतना जागविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास वाटतो.

दुर्गा मातेस केलेले हे आवाहन आज शंभर वर्षानंतरही तितकेच स्फूर्तिदायक ठरते. त्याच्या मनन-चिंतनाने वाचकांच्या मनामध्ये देशप्रेमाचे स्फुरण निर्माण होऊन, भारत मातेच्या आर्यपुत्रांना त्यांच्या जीवितकार्याचे पुन्हा एकवार स्मरण होवो आणि ते कार्यप्रवृत्त होवोत हीच श्रीअरविंद चरणी विनम्र प्रार्थना!

हे दुर्गा स्तोत्र वाचकांसाठी auromarathi.org या संकेतस्थळावर प्रकाशित करताना विलक्षण समाधान लाभत आहे.

**

# दुर्गास्तोत्र

॥ हे माते दुर्गे, सिंहारूढ सर्वशक्तिदायिनी माते, शिवप्रिये, तुझ्या शक्ती-अंशांपासून उत्पन्न झालेले आम्ही भारताचे नवयुवक, येथे तुझ्या मंदिरामध्ये बसून तुझी प्रार्थना करत आहोत. हे माते, आमचे आर्त तू ऐकावेस ही तुझ्या चरणी प्रार्थना आहे; या पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये स्वत:ला प्रकट कर. ॥ १ ॥

॥ हे दुर्गा माते, युगायुगांपासून जन्मजन्मांतरी मानव देह धारण करून, तुझे कार्य करून आम्ही आनंदधामास परत जात असतो. आणि यावेळीदेखील जन्म घेऊन, तुझ्याच कार्यासाठी आम्ही आमचे जीवन अर्पण केले आहे. हे माते, आमची प्रार्थना तू ऐक; या भूतलावर अवतीर्ण होऊन, आम्हास साहाय्य कर. ॥ २ ॥

॥ हे माते दुर्गे, सिंहारूढ त्रिशूलधारिणी, कवचपरिवेष्टित सौंदर्यमूर्ती, विजयप्रदायिनी माते, तुझे मंगलमय रूप पाहण्यासाठी हा भारत उत्सुक आहे. भारत तुझी प्रतीक्षा करत आहे. माते आमची प्रार्थना ऐक, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये स्वत:ला प्रकट कर. ॥ ३ ॥

॥ हे माते दुर्गे, शक्तिदायिनी, प्रेमदायिनी, ज्ञानदायिनी माते, सौंदर्यमूर्ती आणि रौद्ररूपिणी हे माते, जेव्हा तू स्वत:च्या शक्तिस्वरूपात असतेस तेव्हा, तू उग्ररूपिणी असतेस. आम्ही जीवनसंग्रामामध्ये, भारताच्या संग्रामामध्ये तुझ्याकडून नियुक्त करण्यात आलेले योद्धे आहोत. हे माते, आमच्या मनाला आणि हृदयाला दानवांसम बल दे, दानवांसम ऊर्जा दे; आणि आमच्या बुद्धीला आणि आत्म्याला देवांचे शील आणि ज्ञान प्रदान कर. ॥ ४ ॥

॥ हे दुर्गा माते, भारत, जगातील सर्वश्रेष्ठ असा हा भारत वंश, (आज) घोर घनांधकारात बुडून गेला आहे. हे माते, तू पूर्वक्षितिजावर उदय पावतेस तेव्हा, तुझ्या दिव्य गात्रांच्या प्रभेसमवेत उषा येते आणि अंधकाराचा विनाश करते. हे माते, सर्वत्र तुझा प्रकाश पसरव आणि

तिमिर नाहीसा कर. ॥ ५ ॥

॥ हे दुर्गा माते, आम्ही तुझे पुत्र आहोत, तुझ्या कृपाशीर्वादाने आणि तुझ्या प्रभावाने, महान कार्य आणि महान ध्येय यासाठी आम्ही सुपात्र ठरू, असे आम्हाला घडव. हे माते, आमची क्षुद्रता, आमची स्वार्थबुद्धी आणि आमची भीती नाहीशी कर. ॥ ६ ॥

॥ हे माते दुर्गे, तू कालीमाता आहेस; दिगंबरी, नरमुंडमालिनी, खड्गधारिणी तू, असुरांचा विनाश करणारी आहेस. हे देवी, तुझी निर्घृण वीरगर्जना कर आणि आमच्या अंतरंगात ठाण मांडून बसलेल्या शत्रूंचा निःपात कर; एकाही शत्रूला, अगदी एका शत्रूलाही जिवंत ठेवू नकोस. आम्ही निर्मळ आणि निष्कलंक व्हावे, एवढीच आमची प्रार्थना आहे. हे माते, तू आपले रूप प्रकट कर. ॥ ७ ॥

॥ हे दुर्गा माते, स्वार्थ, भीती आणि क्षुद्रता यामध्ये भारत बुडून गेला आहे. हे माते, आम्हास महान बनव, आमचे प्रयत्न (भगीरथासम) महान कर, आमची अंत:करणे विशाल कर आणि आम्हास सत्य-संकल्पाशी एकनिष्ठ राहण्यास शिकव. येथून पुढे तरी आता आम्ही क्षुद्र व शक्तिहीन इच्छा बाळगू नये, आम्ही आळसाच्या आहारी जाऊ नये आणि भीतीने ग्रस्त होऊ नये, अशी आमच्यावर कृपा कर. ॥ ८ ॥

॥ हे माते दुर्गे, (आमची) योगशक्ती विशाल कर. आम्ही तुझे आर्यपुत्र आहोत; आमच्यामध्ये पुन्हा एकवार तीच शिकवण, श्रद्धा व भक्ती आणि तेच चारित्र्य, तेच बुद्धी-सामर्थ्य, तेच तप:सामर्थ्य, ब्रह्मचर्याचे तेज आणि सत्य-ज्ञान विकसित कर; त्या साऱ्याचा या जगावर वर्षाव कर. मानववंशाला साहाय्य करण्यासाठी आणि सर्व अनिष्टाचे भंजन करण्यासाठी हे जगत्जननी, तू प्रकट हो. ॥ ९ ॥

॥ हे माते दुर्गे, आधी आमच्यातील अंत:स्थ शत्रूंचा संहार कर आणि तदनंतर बाह्य विघ्नांचे निर्मूलन कर. उदात्त, पराक्रमी आणि बलशाली असा हा भारतवंश, प्रेम आणि ऐक्य, सत्य आणि सामर्थ्य, कला आणि साहित्य,

शक्ती आणि ज्ञान यामध्ये सर्वोच्च असलेला हा भारतवंश, त्याच्या पावन वनराजींमध्ये, सुपीक प्रदेशांमध्ये, गगनचुंबी पर्वतरांगांमध्ये आणि वाहणाऱ्या पावन नद्यांकाठी, सदा निवास करो; हीच आमची मातृचरणी प्रार्थना आहे. हे माते, तू आविर्भूत हो. ॥ १० ॥

॥ हे दुर्गा माते, तू तुझ्या योगबलाद्वारे आमच्या शरीरामध्ये प्रवेश कर. आम्ही तुझे साधन होऊ, तुझे सर्व अशुभ-विनाशिनी शस्त्र होऊ; तुझा सर्व अज्ञान-विनाशिनी प्रदीप होऊ. हे माते, तुझ्या या लहानग्या बालकांचे हे आर्त पूर्ण कर. स्वामिनी होऊन तुझे हे साधन कार्यकारी कर. तुझे खड्ग चालव आणि अशुभाचा विनाश कर. दीप हाती घे आणि ज्ञानप्रकाश वितरीत कर. हे माते, तू प्रकट हो. ॥ ११ ॥

॥ हे दुर्गा माते, एकदा का तू आम्हास गवसलीस की, आम्ही तुला कधीही सोडून जाणार नाही. प्रेम व भक्तीच्या धाग्यांनी आम्ही तुझ्याशी (सदैव) संबद्ध राहू. हे माते, ये. आमच्या मनामध्ये, प्राणामध्ये आणि देहामध्ये प्रकट हो; आविर्भूत हो. ॥ १२ ॥

॥ हे वीरमार्गप्रदायिनी ये, आम्ही तुला कधीही सोडून जाणार नाही. आमचे अखिल जीवन म्हणजे मातेचे अखंड पूजन व्हावे; आमच्या प्रेममय, ऊर्जामय सर्व कृती म्हणजे मातेचीच अविरत सेवा व्हावी, हीच आमची प्रार्थना आहे. हे माते, पृथ्वीवर अवतीर्ण हो, या भारतभूमीमध्ये तू स्वत:ला प्रकट कर. ॥ १३ ॥

**



श्रीअरविंदांच्या दृष्टिक्षेपातील अखंड भारत

# भवानी मंदिर

# प्रास्ताविक

बंगालच्या फाळणीच्या वेळी, इ. स. १९०५ मध्ये श्री. अरविंद घोष यांनी 'भवानी मंदिर' नावाची पुस्तिका लिहिली होती आणि ती निनावीपणे प्रसृत करण्यात आली होती. श्री. अरविंद घोष हे तेव्हा बडोदा संस्थानाच्या सेवेत कार्यरत होते.

ऋषी बंकिमचंद्र चटर्जी यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीपासून प्रेरणा घेत, अशा प्रकारच्या मंदिराच्या उभारणीची संकल्पना श्री. अरविंद घोष यांचे धाकटे बंधू व क्रांतिकारक श्री. बारीन्द्र कुमार घोष यांच्या मनात निर्माण झाली. त्यासाठीचे लेखन श्री. अरविंद घोष यांनी केले. 'भारतमाता हीच भवानी देवी आहे' अशी संकल्पना येथे मांडण्यात आलेली आहे. देशभक्त संन्यासी किंवा ब्रह्मचारी लोकांना स्वातंत्र्य-चळवळीत सहभागी होता यावे या दृष्टीने, त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी श्री. अरविंद घोष यांनी एका क्रांतिकारी समाजाची संकल्पना 'भवानी मंदिर' या पुस्तिकेमध्ये प्रस्तावित केली होती.

या पुस्तिकेची एक प्रत ब्रिटिशांना बडोद्याजवळ भरूच येथे सापडली आणि तिचा वापर श्री. अरविंद घोष यांच्या विरोधात अलिपूर बॉंब प्रकरणात पुरावा म्हणून करण्यात आला.

भवानी मंदिर निर्माण करण्याची कल्पना श्री. अरविंद घोष यांनी 'राष्ट्रमत'चे तत्कालीन संपादक श्री. हरिभाऊ मोडक आणि वसईचे वकील श्री. काकासाहेब पाटील यांच्याकडे मांडली होती. परंतु बंगालच्या विभाजनामुळे परिस्थितीने वेग घेतला आणि भवानी मंदिराची संकल्पना अमूर्तच राहिली. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'हिंदुस्थान स्टँडर्ड' या नियतकालिकामध्ये ऑक्टोबर १९५६ मध्ये ती पुस्तिका पुनर्प्रकाशित करण्यात आली.

भवानी मंदिर या पुस्तिकेमध्ये श्री. अरविंद घोष यांनी भारतीयांमध्ये राजकीय इच्छाशक्ती आणि एकता नसल्याचा निषेध केला आहे; तसेच शक्तीचा अभाव असल्याचे दर्शवून दिले आहे. यामध्ये त्यांनी भारतीयांना

राष्ट्रदेवतेच्या सेवेत पूर्णपणे वाहून घेण्याचे आवाहन केले आहे.

या पुस्तिकेचे महत्त्व आजच्या काळातदेखील तसूभरही कमी झालेले नाही, असा प्रत्यय वाचकांना येईल. ही पुस्तिका एका बैठकीत वाचून पूर्ण केली तर, श्री. अरविंद घोष यांच्या ओजस्वी लेखणीचा स्पर्श होऊन त्यायोगे, वाचकांच्या मनात राष्ट्रप्रेम जागृत झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास वाटतो.

या मराठी अनुवादासाठी (CWSA) - The Complete Works of Sri Aurobindo च्या सहाव्या खंडातील इंग्रजी ‘भवानी मंदिर’चा संदर्भ घेण्यात आला आहे.

**

# भवानी मंदिर

## ॐ नमः चण्डिकायै

पर्वतवासिनी असणाऱ्या भवानी मातेचे मंदिर उभारायचे आहे आणि तिच्याप्रति सर्वस्व समर्पित करायचे आहे. मातेच्या सर्व लेकरांना, या पवित्र कार्यामध्ये सहभागी होण्याची हाक देण्यात येत आहे.

## भवानी म्हणजे कोण?

भवानी माता म्हणजे कोण आणि आपण तिचे मंदिर का उभारायचे?

## भवानी म्हणजे अनंत ऊर्जा

या विश्वाच्या अथक परिभ्रमणातून, 'शाश्वता'चे चक्र त्याच्या चाकोरीतून प्रचंड वेगाने फिरत असताना, त्या 'शाश्वता'तून 'अनंत ऊर्जा' प्रवाहित होत आहे आणि त्या चक्रास सक्रिय करत आहे; विविध पैलूंनी आणि अनंत रूपांनी फिरत असलेले ते चक्र माणसाच्या दृष्टीला दिसत आहे. प्रत्येक पैलू निर्माण होतो आणि त्या त्या युगावर स्वतःचा ठसा उमटवितो. भवानी माता ही कधी 'प्रेम' असते, तर कधी 'ज्ञान' असते. कधी ती 'परित्याग' असते, तर कधी ती 'दया' असते. ही 'अनंत ऊर्जा' हीच भवानी आहे. ती 'दुर्गा'सुद्धा आहे, तीच 'काली' आहे, ती प्रेमस्वरूप 'राधा' आहे, तीच 'लक्ष्मी' आहे. ती आपली 'माता' आहे आणि आपल्या सर्वांची ती 'जन्मदात्री' आहे.

## भवानी ही 'शक्ती' आहे

सद्यकाळामध्ये, ही माता 'शक्ती' या स्वरूपात आविष्कृत झाली आहे. ती विशुद्ध 'शक्ती' आहे.

## समग्र विश्व हे आता मातेची 'शक्ती' म्हणून वर्धिष्णू होत आहे

डोळे उघडू या आणि आपल्या अवतीभोवती असणाऱ्या जगाकडे पाहू या. जिथेजिथे आपण आपली नजर फिरवू तिथे, आपल्या नजरेसमोर आपल्याला सामर्थ्याचे, शक्तीचे प्रचंड समूह; अतिप्रचंड, वेगवान आणि

ज्यांच्या घोडदौड करणाऱ्या पावलांना लगाम घालता येणार नाहीत अशा शक्ती; ऊर्जांच्या महाकाय आकृत्या आणि शक्तींचे प्रचंडकारी असे भयावह स्तंभ उभे असलेले दिसत आहेत. आणि या साऱ्या गोष्टी अधिकाधिक विशाल व बळकट होत चालल्या आहेत. युद्ध-शक्ती, धन-शक्ती, विज्ञान-शक्ती या सर्व शक्ती आता दसपटीने अधिक शक्तिशाली आणि अवाढव्य झाल्या आहेत. त्या त्यांच्या कृतींबाबत शतपटीने अधिक उग्र, वेगवान आणि कार्यकारी झाल्या आहेत. विविध स्रोत, शस्त्रास्त्रे आणि उपकरणे यांच्या बाबतीत, इतिहासामध्ये या पूर्वी कधीच नोंदविली गेली नव्हती इतकी, हजारपट विपुलता आज या शक्तींमध्ये आली आहे. सर्वत्र 'दिव्य माता' कार्यरत आहे आणि तिच्या सामर्थ्यशाली व निर्माणकारी हातांमधून राक्षसांची, असुरांची तसेच देवदेवतांची अगणित रूपं बाहेर पडून, जगाच्या आखाड्यामध्ये झेपावत आहेत. आपण पश्चिमेकडील महान साम्राज्यांचा संथ पण शक्तिशाली उदय पाहिला आहे, तसेच आपण जपानच्या जीवनामध्ये वेगवान, दुर्दम्य आणि साहसी वृत्ती उफाळून वर आलेली पाहिली आहे. यापैकी काही शक्ती या म्लेंच्छ शक्ती आहेत; तामसिकतेमुळे आणि राजसिकतेमुळे त्या काळ्या किंवा रक्तवर्णी झाल्या आहेत, त्यांचे सामर्थ्य झाकोळले गेले आहे. तर इतर आर्य शक्ती आहेत की, ज्या परित्यागाच्या (renunciation) आणि शुद्ध आत्म-बलिदानाच्या विशुद्ध ज्वालांमध्ये न्हाऊन निघालेल्या आहेत. पण या सर्वच शक्ती म्हणजे एका नूतन अवस्थेमध्ये असलेली, पुनर्घडण आणि पुनर्निर्मिती करणारी 'दिव्य माताच' आहे. ती तिचे चैतन्य पुरातन साच्यामध्ये ओतत आहे, ती जीवनाच्या रहाटगाडग्यामध्ये एक नव-संजीवनी ओतत आहे.

### 'शक्ती'च्या अभावामुळे आपण भारतामध्ये सर्व गोष्टींमध्ये अपयशी ठरत आहोत

भारतामध्ये चैतन्य जागृत होण्यास वेळ लागतो. आपली प्राचीन भारतमाता, पुनर्जन्म घेण्यासाठी धडपड करत आहे. प्रसंगी अश्रू ढाळत,

प्राणांतिक यातना सोसत, ती निकराचे प्रयत्न करत आहे; पण तिचे ते सारे प्रयत्न व्यर्थ ठरत आहेत. एवढी विशाल आणि इतकी बलशाली असूनही, ती कशामुळे व्यथित आहे? निश्चितपणे आपल्यामध्येच काहीतरी प्रचंड दोष असला पाहिजे, निश्चितपणे आपल्यामध्ये एखादी मोठी उणीव असली पाहिजे; आणि ती कमतरता कोणती यावर नेमकेपणाने बोट ठेवणेही फारसे काही अवघड नाही.

आपल्याकडे इतर सर्व गोष्टी आहेत पण आपण सामर्थ्यविहीन आहोत, आपण ऊर्जाविहीन आहोत. आपण शक्तीला डावलले आहे आणि त्यामुळे आता शक्ती आपल्याला सोडून गेली आहे. आता आपली माता आपल्या हृदयांमध्ये, आपल्या मेंदूमध्ये, आपल्या बाहुंमध्ये नाही. पुनरुज्जीवित व्हावे ही इच्छा आपल्याकडे मुबलक प्रमाणात आहे, त्याची इथे वानवा नाही. आजवर कितीतरी प्रयत्न झाले. धार्मिक, सामाजिक, राजकीय चळवळी आजवर कमी का झाल्या? परंतु प्रत्येक वेळी तोच दैवदुर्विलास आपल्या वाट्याला आला किंवा आजही तेच दुर्भाग्य वाट्याला येण्याची चिन्हे दिसत आहेत. ते सारे प्रयत्न क्षणकाल बहरून जातात; नंतर तो आवेग, तो जोम ओसरतो, तो अग्नी विझून जातो. आणि जर ते प्रयत्न टिकून राहिलेच तर जणू ते रिकाम्या शिंपल्यांप्रमाणे असतात, चैतन्य निघून गेलेल्या कलेवराप्रमाणे असतात; अन्यथा मग, त्यांच्यावर तामसिकता व जडत्व यांचे वर्चस्व निर्माण होते. आपला प्रारंभ जोरदार असतो, पण त्याला परिपूर्ती असत नाही किंवा त्याला फळेदेखील धरत नाहीत.

आता आपण दुसऱ्या दिशेने सुरुवात केली आहे. आपल्या नापीक भूमिचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आणि ती भूमी समृद्ध करण्यासाठी, आता आपण एका महान औद्योगिक आंदोलनाचा आरंभ केला आहे. आपण जर आपल्या अनुभवावरून धडा घेतला नाही आणि त्यानुसार जर आपण आवश्यक असणारी गोष्ट मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहिलो नाही, शक्तिसामर्थ्य संपादन केले नाही तर, ही चळवळसुद्धा (वर

उल्लेख केल्याप्रमाणे) इतर अनेक प्रयत्नांच्या वाटेने कधी निघून गेली हे आपल्याला कळणारसुद्धा नाही.

### ‘शक्ती’च्या अभावामुळे आपले ज्ञान मृतवत झाले आहे

आपल्याकडे ज्ञानाची कमतरता आहे का? आपण भारतीय तर अशा देशात जन्माला आलो आहोत, आपले भरणपोषण अशा देशामध्ये झाले आहे की, जेथे मानववंशाच्या प्रारंभापासूनचे ज्ञानसंचित आहे, हजारो वर्षांपासून वारशाने मिळालेली संपदा आपल्याकडे आहे. या ज्ञानसंचितामध्ये भर घालण्यासाठी आजही दिग्गज ज्ञानवंत मंडळी आपल्यामध्ये उदयाला येत आहेत. आपली क्षमता आटली नाहीये, आपल्या बुद्धीची धारही बोथट झालेली नाहीये किंवा ती गंजली नाहीये, बुद्धीची ग्रहणशीलता व तिचे चापल्य यांच्यामध्ये गतकाळाएवढे वैविध्य अजूनही टिकून आहे. पण हे ज्ञान मृतवत झाले आहे, त्याच्या भाराखाली आपण दबून गेलो आहोत. ते ज्ञान आपल्या पायांना आधार देणारी काठी होण्याऐवजी आणि आपल्या हातांमधील शस्त्र बनण्याऐवजी, ते आपलाच विनाश करणारे विष बनत आहे. कारण सर्व महान गोष्टींचे स्वरूप हे असेच असते; जर त्या गोष्टी उपयोगात आणल्या गेल्या नाहीत किंवा त्यांचा गैरवापर झाला तर त्यांच्या धारणकर्त्यावरच त्या गोष्टी उलटतात आणि त्यालाच नष्ट करतात. मग, आपले ज्ञान तामसिकतेच्या अवजड भाराखाली घुसमटले जाते, नपुंसकत्व आणि निष्क्रियता यांच्या शापाखाली ते दडपले जाते.

विज्ञान प्राप्त केले तर सारे काही ठीक होईल अशा कल्पनांमध्ये रमणे अलीकडे आपण पसंत करतो. पण आपण स्वत:ला प्रथम ही गोष्ट विचारली पाहिजे की, जे ज्ञान आपल्याकडे आधीपासूनच होते, त्याचे आपण काय केले? किंवा ज्यांना विज्ञान आधीच अवगत झाले आहे, त्यांनी या भारतासाठी काय केले? पुढाकार घेण्यास असमर्थ असलेले आणि अनुकरणप्रिय असणारे आपण, शक्तिसामर्थ्य नसूनही, इंग्लंडच्या रितीभातींची नक्कल करण्यासाठी धडपडलो आणि आता आपण ज्या

जपानी लोकांच्या रितीभातींची नक्कल करू पाहणार आहोत, ते तर अधिकच उद्यमशील लोक आहेत; आपण आता काय त्यांच्यापेक्षाही अधिक यशस्वी होण्याची आशा बाळगत आहोत? युरोपियन विज्ञानाने देऊ केलेली ज्ञानाची प्रचंड शक्ती, जी बलवतांच्या हातचे शस्त्र बनली आहे, ती शक्ती म्हणजे भीमसेनाच्या हातातील गदा आहे. दुर्बल माणूस तिचे काय करणार? ती चालविण्याच्या प्रयत्नात तो स्वत:च चिरडला जाणार हे स्पष्ट आहे.

**'शक्ती'शिवाय 'भक्ती' तग धरू शकत नाही, कार्य करू शकत नाही**

आपल्यामध्ये प्रेमाची, उत्साहाची, भक्तीची कमतरता आहे का? नाही. या गोष्टी तर भारतीय प्रकृतीमध्येच रुजलेल्या आहेत, पण शक्तीच्या अभावामुळे आपण त्यांच्यावर लक्ष एकाग्र करू शकत नाही, त्यांना आपण दिशा देऊ शकत नाही, एवढेच काय पण आपण या गोष्टी टिकवून देखील ठेवू शकत नाही. भक्ती ही धगधगती ज्वाळा आहे तर शक्ती हे तिचे इंधन आहे. जर इंधनच अपुरे असेल तर अग्नी किती काळ टिकून राहील?

एखाद्या व्यक्तीची प्रकृती सुदृढ असेल, ती व्यक्ती ज्ञानप्रदीप्त व शिस्तबद्ध असेल, तसेच कर्माद्वारे तिला प्रचंड सामर्थ्य प्राप्त झाले असेल; आणि ती व्यक्ती ईश्वरविषयक प्रेमाने व भक्तीने जर स्वत:ला उन्नत करेल, तर अशी भक्ती टिकून राहील आणि अशा व्यक्तीचा आत्मा ईश्वराबरोबर सदैव ऐक्य पावलेला असेल. मात्र दुर्बल व्यक्ती परिपूर्ण भक्तीसारख्या महान गोष्टीचा आवेग पेलण्यास अगदीच असमर्थ ठरते. अशी व्यक्ती क्षणभरासाठीच उन्नत होते, मग ती ज्वाळा स्वर्गाला जाऊन भिडते आणि त्यामुळे ती व्यक्ती पूर्णपणे थकून जाते, पूर्वीपेक्षाही अधिक दुर्बल बनून जाते.

फक्त उत्साह व भक्ती यावर आधारित असलेली चळवळ, ज्या मानवी घटकद्रव्याद्वारे चालते, ते जोपर्यंत दुर्बल व निस्तेज असते तोपर्यंत, ती प्रत्येक चळवळ असफल होणे आणि नामशेष होणे क्रमप्राप्तच असते.

## भारताला केवळ शक्तीचीच आवश्यकता आहे

आपण जितका अधिकाधिक खोलवर वेध घेऊ तितकी, आपली अधिकाधिक खात्री होत जाईल की, आपल्यामध्ये केवळ एकाच गोष्टीची कमतरता आहे आणि ती गोष्ट म्हणजे सामर्थ्य! इतर कोणत्याही गोष्टी प्राप्त करून घेण्यापूर्वी, आपण सामर्थ्य मिळविण्यासाठी धडपड केली पाहिजे. ते म्हणजे शारीरिक सामर्थ्य, मानसिक सामर्थ्य, नैतिक सामर्थ्य; पण सर्वांत महत्त्वाचे सामर्थ्य म्हणजे आध्यात्मिक सामर्थ्य. हे सामर्थ्य इतर सर्व सामर्थ्यांचा अक्षय, अविनाशी स्रोत आहे.

आपल्याकडे सामर्थ्य असेल तर, इतर सर्व गोष्टी आपल्याला सहज-स्वाभाविकपणे मिळतील. पण सामर्थ्य नसेल तर, आपली अवस्था स्वप्नातल्या माणसांप्रमाणे होते; ज्यांना हात असतात पण ते काही पकडू शकत नाहीत किंवा प्रहारदेखील करू शकत नाहीत; त्यांना पाय असतात पण ते धावू शकत नाहीत.

## वयोवृद्ध झालेल्या आणि इच्छाशक्ती क्षीण झालेल्या भारताला पुनरुज्जीवित व्हावेच लागेल

आपण काहीतरी करण्याची जेव्हा धडपड करू लागतो तेव्हा उत्साहाचा पहिला बहर ओसरल्यानंतर, जणू पक्षाघात (paralysis) झाल्याप्रमाणे आपण असहाय्य होतो. आपल्याला पुष्कळ वेळा असे आढळते की, बरेचसे वयोवृद्ध अनुभवसंपन्न असतात. मात्र त्यांचा अनुभव इतका प्रचंड असतो की, ज्ञानाच्या अतिभारामुळे त्यांची कार्यशक्ती आणि इच्छाशक्ती जणू थिजून गेलेली असते. जेव्हा एखाद्या महान भावनेमुळे किंवा महान गरजेमुळे ते भारावून जातात आणि त्यातून मिळालेली प्रेरणा प्रत्यक्षात आणण्याची आवश्यकता निर्माण होते तेव्हा मात्र ते कचरतात, ते विचारमग्न होतात, ते चर्चा करत राहतात; काहीसे तात्पुरते, वरवरचे प्रयत्न करत राहतात आणि मग प्रयत्न करणेच सोडून देतात; अन्यथा सर्वांत थेट मार्ग निवडण्यापेक्षा, सुरक्षित आणि सोपा मार्ग सुचण्याची ते वाट पाहत राहतात; अशा प्रकारे जेव्हा कृती करणे शक्य असते आणि आवश्यकही

असते तेव्हा वेळ निघून गेलेली असते.

त्या वयोवृद्ध माणसांप्रमाणे आपला (भारत)वंशदेखील ज्ञानसमृद्ध, संवेदनक्षम आणि इच्छाकांक्षी आहे परंतु सुस्ती, वार्धक्यजन्य भयामुळे व वार्धक्यजन्य दुर्बलतेमुळे तो अगदी लुळा-पांगळा झाला आहे. भारताला जर टिकून राहायचे असेल तर, तो पुनश्च युवा भारत बनला पाहिजे. ऊर्जेचा सळसळणारा, खळाळणारा प्रवाह भारतामध्ये पुन्हा ओतला गेला पाहिजे; भारताचा आत्मा प्राचीन काळी होता त्याप्रमाणेच पुन्हा एकदा सळसळणारा, विशाल, भारदस्त, स्वेच्छेनुसार कधी शांत तर कधी वादळी आणि कृतीचा वा शक्तीचा जणू महासागर झाला पाहिजे.

## भारत पुनरुज्जीवित होऊ शकतो

आपल्यामधील बरेचजण पूर्णपणे तामसिकतेच्या, काळोख्या आणि सुस्त अशा जड दानवाच्या अंमलाखाली येऊन आजकाल असे म्हणत आहेत की, “भारत पुनरुज्जीवित होणे अशक्य आहे; कारण भारत आता क्षीण झाला आहे, तो रक्तहीन आणि प्राणहीन झाला आहे; तो पुन्हा कधीच पूर्वपदावर येऊ शकणार नाही इतका दुर्बल झाला आहे, आता आपला वंश हा नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे.” मात्र असे म्हणणे हे मूर्खपणाचे आणि आळशीपणाचे लक्षण आहे.

कोणताही मनुष्य किंवा कोणतेही राष्ट्र स्वतःहून निवड करत नाही तोवर तो मनुष्य किंवा ते राष्ट्र दुर्बल बनू शकत नाही. एखादा मनुष्य किंवा एखादे राष्ट्र जोपर्यंत स्वतः जाणिवपूर्वक नामशेष होण्याचे ठरवत नाही तोपर्यंत तो मनुष्य किंवा ते राष्ट्र लयाला जाऊ शकत नाही.

## राष्ट्र म्हणजे काय? तर, त्याच्या कोट्यवधी नागरिकांची शक्ती

राष्ट्र म्हणजे तरी काय? आपली मातृभूमी म्हणजे काय? तो काही एखादा जमिनीचा तुकडा नाही, किंवा तो काही एखादा भाषिक अलंकार नाही किंवा ती मनाची कल्पनादेखील नाही. आपली मातृभूमी ही एक महान शक्ती आहे. लाखो राष्ट्र-निर्माणकारी घटकांच्या शक्तींनी मिळून तिची रचना झालेली आहे. ज्याप्रमाणे लक्षावधी देवदेवतांची शक्ती

एकत्रित होऊन, एकसंध असा एक शक्तिसमूह तयार झाला आणि त्या एकसंध अशा समूहामधून ज्याप्रमाणे भवानी महिषासुर-मर्दिनी प्रकट झाली अगदी त्याचप्रमाणे आपल्या मातृभूमीची घडण झाली आहे.

ज्या शक्तीला आपण 'भारत', 'भवानी भारती' असे संबोधतो, ते तीस कोटी लोकांच्या (तेव्हाची भारताची लोकसंख्या) शक्तीचे चैतन्यमय एकीकरण आहे. परंतु ती शक्ती निष्क्रिय झाली आहे, ती तिच्या अपत्यांच्या स्व-मग्न जडत्वामध्ये, अज्ञानामध्ये आणि तामसिकतेच्या मोहांध आवर्तामध्ये बंदिवान झाली आहे. या तामसिकतेमधून सुटका करून घेण्यासाठी, आपल्याला आपल्या अंतरंगामधील 'ब्रह्म' जागृत केले पाहिजे.

### राष्ट्र निर्माण करायचे की नामशेष होऊन जायचे हा आपला स्वत:चा निर्णय असणार आहे

हजारो साधुसंन्यासी आणि सत्पुरुष यांनी आजवर शांतपणाने, त्यांच्या जीवनाद्वारे आपल्याला कोणती शिकवण दिली आहे? भगवान रामकृष्ण परमहंस यांच्या व्यक्तिमत्त्वामधून कोणता संदेश प्रसृत होतो? सिंहासारख्या निधड्या छातीने विवेकानंदांनी ज्या वाणीद्वारे निद्रिस्त जगाला जागे करण्याचा प्रयत्न केला त्या वाणीचा गाभा नेमका कशाचा बनला होता?

सिंहासनाधीश असलेल्या राजापासून ते कष्टकऱ्यापर्यंत, संध्यामग्न असलेल्या ब्राह्मणापासून ते वाळीत टाकलेल्या एखाद्या माणसापर्यंत, सर्वांमध्येच तो 'ईश्वर' निवास करतो. आणि हा तोच गाभा आहे की जो, या तीस कोटी माणसांमधील, प्रत्येकामध्ये वसलेला आहे. आपण सर्वजण देव व निर्माणकर्ते आहोत, कारण ईश्वराची ऊर्जा आपल्या अंतरंगामध्ये आहे आणि सर्व जीवन ही त्याची निर्मिती आहे. केवळ नवीन रूपं घडविण्यामध्येच निर्मिती आहे असे नाही तर, जतन व संरक्षण करणे हीसुद्धा निर्मितीच असते; एवढेच काय पण, स्वयमेव विनाश हीसुद्धा एक निर्मितीच असते. तेव्हा, काय निर्माण करायचे हे आपल्यावर अवलंबून

असते; कारण आपण म्हणजे काही नियती आणि माया यांच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या नाही. (अर्थात्, एखाद्याने तशीच निवड केली असेल तर गोष्ट वेगळी.) आपण 'सर्वशक्तिमान शक्ती'चे विविध आयाम आहोत, आपण त्या शक्तीचे विविध आविष्कार आहोत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

## भारताचे पुनरुज्जीवन झालेच पाहिजे, कारण जगाचा भावीकाळच तशी मागणी करत आहे

भारताचा अस्त होऊच शकणार नाही, आपला (भारत)वंश नाहीसा होऊ शकणार नाही कारण मानवजातीच्या सर्व प्रभागांमध्ये, भारत हाच असा एकमेव देश आहे की, ज्याच्याकडे सर्वोच्च व उज्ज्वल भाग्याचे भांडार आहे आणि त्याची मानववंशाच्या भवितव्यासाठी सर्वाधिक आवश्यकता आहे.

जो शाश्वत धर्म सर्व धर्मांमध्ये, विज्ञानामध्ये आणि तत्त्वज्ञानामध्ये सुसंवाद निर्माण करू शकेल; जो समस्त मानवजातीस एकात्म करू शकेल आणि जो धर्म अखिल जगाचा भावी धर्म असेल असा शाश्वत धर्म, भारताने स्वत:मधून उदयाला आणला पाहिजे आणि त्याचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे. त्याचप्रमाणे नैतिकतेच्या क्षेत्रामध्येदेखील मानवामधील क्रौर्य, रानटीपणा, असंस्कृतपणा (म्लेंच्छपणा) हद्दपार करणे आणि समस्त जग आर्यमय करणे हे भारताचे जीवितकार्य आहे. आणि हे करण्यासाठी भारताने सर्वप्रथम पुन्हा एकदा स्वतःला आर्यमय केले पाहिजे.

मानवजातीला देण्यात आलेले असे हे महान आणि अत्युत्तम कार्य आरंभण्यासाठीच भगवान रामकृष्ण परमहंस अवतरले आणि विवेकानंदांनी शिकवण दिली तीदेखील याचसाठी! हे कार्य घडून येईल असे एकेकाळी वचन मिळालेले असतानासुद्धा, हे कार्य जर पूर्णत्वाला गेले नसेल तर त्याचे कारण हेच आहे की, आपण पुन्हा एकदा तामसिकतेचे म्हणजे भीती, शंका, कचखाऊपणा, सुस्तपणा यांचे भयंकर मळभ आपल्या आत्म्यांवर स्थिरावू दिले आहे.

आपल्यापैकी काही जणांनी, एकाकडून (रामकृष्ण परमहंस

यांच्याकडून) प्रवाहित झालेली भक्ती स्वीकारली, तर काही जणांनी दुसऱ्याकडून (स्वामी विवेकानंदांकडून) प्रदान करण्यात आलेले ज्ञान स्वीकारले; पण शक्तीच्या अभावी, कर्माच्या अभावी, आपण आपल्या या भक्तीला एक चैतन्यमय गोष्ट बनवू शकलो नाही.

आपण अजूनही हे लक्षात ठेवले पाहिजे की, रामकृष्ण परमहंस जिची भक्ती करत होते आणि जिच्याशी ते एकरूप झाले होते, ती कालीमाता होती, ती शक्तिमाता होती, भवानी माता होती. अर्थात भारताचे भवितव्य हे कोणा व्यक्तींच्या चुकांमुळे वा पतनामुळे थांबणार नाही. मातेविषयीची उपासना प्रतिष्ठापित करण्यासाठी आणि ती उपासना विश्वव्यापी बनविण्यासाठी लोकांनी जागृत व्हावे, अशी मागणी आता माता करत आहे.

## सामर्थ्य संपादन करण्यासाठी आपण शक्तिमातेची आराधना केली पाहिजे

सामर्थ्य, पुन्हा सामर्थ्य आणि पुन्हा त्याहूनही अधिक सामर्थ्य हीच आपल्या (भारत)वंशाची आवश्यकता आहे. आणि आपण जर सामर्थ्य मिळविण्याची इच्छा बाळगत असू, तर शक्तिमातेची आराधना न करताच, ते आपल्याला कसे बरे संपादन करता येईल? शक्तिमाता आपल्याकडे आराधनेची जी मागणी करत आहे ती काही तिच्या स्वत:साठी नाही तर, त्यायोगे ती आपल्याला मदत करू शकेल आणि तिचे शक्तिसामर्थ्य ती आपल्याला प्रदान करू शकेल; त्यासाठी ती आराधनेची मागणी करत आहे. ही काही एरवादी अचाट कल्पना नाही किंवा अंधश्रद्धादेखील नाही तर, या विश्वाचा हा सर्वसाधारण नियम आहे.

देवांकडे जर मागणी करण्यात आली नाही तर, ते त्यांच्यापाशी जे असते ते आपल्याला देऊ शकत नाहीत. एवढेच काय पण, अजाणतेपणी मनुष्यामध्ये ते 'शाश्वत'सुद्धा उदयाला येऊ शकत नाही. प्रत्येक भक्ताला अनुभवांती हे कळलेले असते की, आपल्याला ईश्वराभिमुख व्हावे लागते, त्याची आस बाळगावी लागते, त्याची आराधना करावी लागते आणि तेव्हा

मग ‘ईश्वरी चैतन्य’ त्याच्या अपार सौंदर्याचा आणि परमानंदाचा भक्तावर वर्षाव करते. जे त्या ‘शाश्वता’बाबत आहे तेच त्याच्यापासून निर्माण झालेल्या ‘शक्ती’बाबतही खरे आहे.

## धर्म हाच खरा मार्ग!

पाश्चात्त्य विचारांनी, कल्पनांनी जे लोक भारावून गेलेले असतात, ते ऊर्जेच्या प्राचीन स्रोतांकडे पुन्हा परतण्याकडे अविश्वासाने पाहू लागतात. अशा लोकांनी काही मूलभूत तथ्ये विचारात घेतली पाहिजेत.

### जपानचे उदाहरण

आधुनिक जपानमध्ये जशी अचानकपणे सामर्थ्याची आश्चर्यकारक लाट उसळली तसे एकही उदाहरण आजवरच्या इतिहासामध्ये सापडत नाही. या लाटेबाबत आजकाल सर्व प्रकारचे सिद्धान्त मांडले जात आहेत. पण त्या लोकांच्या या शक्तिशाली जागृतीचे, त्यांच्या अक्षय सामर्थ्याचे मूळ स्रोत कोठे होते, हे आता काही जपानी बुद्धिवंतच आपल्याला सांगू लागले आहेत. ही ऊर्जा त्यांनी त्यांच्या धर्मापासून घेतली होती, असे त्यांचे सांगणे आहे.

जपानचा सम्राट मिकाडो याच्या प्रतिमेद्वारे व व्यक्तित्वाद्वारे, तसेच जपानच्या राष्ट्रीय शक्तीच्या आराधनेमुळे, शिंटो धर्माचे झालेले पुनरुज्जीवन आणि ओयोमेई या तत्त्ववेत्त्याची वैदिक शिकवण यामुळे जपानसारख्या एका छोट्या बेटावरील साम्राज्याला पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञानाची विस्मयकारक शस्त्रास्त्रे पेलता आली. अर्जुनाने ज्या सहजतेने आणि ज्या अजिंक्यपणे गांडीव धनुष्य पेलले होते त्याच सहजतेने आणि तशाच अजिंक्यपणाने जपानने ती शस्त्रास्त्रे पेलली.

## भारताला आध्यात्मिक पुनरुज्जीवनाची अधिकच गरज आहे

धर्मस्रोतांकडून शक्तिसामर्थ्य संपादन करण्याची भारताची गरज जपानपेक्षा कितीतरी अधिक आहे. कारण जपानला त्यांच्याकडे एकेकाळी अस्तित्वात असलेले सामर्थ्यच पुन्हा एकदा जिवंत करायचे होते, परिपूर्ण करायचे होते. आणि आपल्याला मात्र आजवर नसलेले

असे शक्तिसामर्थ्य (धर्मस्रोतांच्या आधारे) निर्माण करावे लागणार आहे. त्यासाठी आपल्याला आपली प्रकृती बदलावी लागणार आहे आणि आपल्याला नवीन अंत:करणाची नवी माणसे घडवावी लागणार आहेत, आपल्याला पुनर्जन्म घ्यावा लागणार आहे. यासाठी कोणतीही यंत्रणा वा कोणतीही शास्त्रीय पद्धत अस्तित्वात नाही.

सर्व नव-अस्तित्वांचे उगमस्थान असणाऱ्या शाश्वताच्या आद्यशक्तीकडून आणि आत्मचैतन्याच्या आंतरिक व अक्षय साठ्यामधून शक्तिसामर्थ्य संपादन केल्यामुळेच, सामर्थ्याची निर्मिती होऊ शकते. पुनर्जन्म घ्यायचा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, आपल्या अंतरंगातील ब्रह्म पुनरुज्जीवित करायचे. ही आध्यात्मिक प्रक्रिया असते आणि केवळ शारीरिक किंवा बौद्धिक प्रयत्न येथे पुरे पडू शकत नाहीत.

### धर्म हा राष्ट्रीय मनाचा स्वाभाविक मार्ग आहे

भारताच्या सर्वाधिक बलशाली आणि सर्वाधिक विविधतापूर्ण ओजस्वी कालखंडांमध्ये, भारतात आजवर झालेल्या सर्व महान जागृतींमध्ये, भारताने आपली ऊर्जाशक्ती सखोल धार्मिक प्रबोधनाच्या काही स्रोतांकडून संपादन केली होती. (भारतामध्ये आजवर) जेथे संपूर्ण व भव्य प्रमाणात धार्मिक प्रबोधन आणि जागृती झालेली आहे तेथे, त्याद्वारे निर्माण झालेली राष्ट्रीय ऊर्जा ही प्रचंड व सामर्थ्यवान राहिलेली आहे आणि जेथे धार्मिक चळवळ संकुचित किंवा अपूर्ण राहिली आहे तेथे राष्ट्रीय चळवळ खंडित, अपूर्ण किंवा तात्पुरत्या स्वरूपाची ठरली आहे. या गोष्टीचे सातत्य, म्हणजे येथील वंशाच्या प्रकृतिधर्मामध्ये, नसानसांमध्ये धार्मिक प्रबोधन खोलवर रूजले असल्याचा पुरावा आहे. तुम्ही जर अन्य आणि परकीय पद्धतींचा अवलंब कराल तर, एकतर आपण आपले साध्य हे मोठ्या जिकिरीने, संथपणाने, कष्टपूर्वक आणि अपूर्णपणे कसेबसे संपादन करू; अन्यथा आपण ते साध्यच करून घेणार नाही. ईश्वराने आणि दिव्य मातेने तुमच्यासाठी आखून दिलेला साधासरळ मार्ग सोडून, तुम्ही तुमचा धूसर वाटेचा आणि वळणावळणाचा मार्ग का बरे निवडता?

## अंतरंगातील आत्मा हाच सामर्थ्याचा खरा स्रोत असतो

सारे भौतिक व मानसिक जीवन ज्यापासून शक्ती प्राप्त करून घेत असते असा, एकमेव व अखंड आध्यात्मिक शक्तीचा महासागर म्हणजे अंतरंगामध्ये असणारे ब्रह्म! प्राचीन काळापासून पौर्वात्यांकडून या सत्याला जशी मान्यता होती, तशीच मान्यता त्याला आता अग्रगण्य पाश्चात्त्य विचारवंतांकडूनसुद्धा मिळू लागली आहे. आणि हे जर असेच असेल तर, आध्यात्मिक ऊर्जा हीच आपल्या अन्य सर्व सामर्थ्यांचा स्रोत आहे. तेथे अथांग, सखोल आणि अक्षय शक्तींचे स्रोत आहेत. उथळ पृष्ठभागावरील झऱ्यांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे असते पण ते झरे लवकरच कोरडेशुष्क पडतात. असे पृष्ठभाग खरवडत बसण्यापेक्षा खोलवर जाऊन, ही आध्यात्मिक ऊर्जा आपण का प्राप्त करून घेऊ नये? त्यातून जे निष्पन्न होईल, त्यामुळे केलेल्या परिश्रमांचे चीज होईल.

## तीन आवश्यक गोष्टी

तीन मौलिक नियमांना अनुसरून तीन गोष्टींची आपल्याला आवश्यकता आहे

### ०१) मातेचे मंदिर - भक्ती

आपण शक्तिमातेची आराधना केल्याशिवाय आपल्याला सामर्थ्य लाभणे शक्य नाही. त्यासाठी म्हणून आपण शुभ्रधवल भवानीमातेचे एक मंदिर बांधणार आहोत; ते शक्तिमातेचे, 'भारतमाते'चे मंदिर असणार आहे. शांत व ऊर्जेने भारलेल्या अशा एका उन्नत, उदात्त व पवित्र वातावरणामध्ये आणि आधुनिक शहरी जीवनाच्या गजबजाटापासून दूर व अजूनपर्यंत काहीशा अस्पर्शित असणाऱ्या जागी, आपण हे मंदिर उभारणार आहोत. केंद्रस्थानी हे मंदिर असेल आणि त्या मंदिराच्या माध्यमातून भारतमातेबद्दलची भक्ती संपूर्ण देशामध्ये प्रवाहित होणार आहे; कारण तिची पूजाअर्चना ही डोंगरमाथ्यांवर होत राहिली तरी, ही भारतमाता तिच्या भक्तांच्या हृदयांमध्ये आणि त्यांच्या मेंदुंमध्ये तिच्या

भक्तीचे अग्निवत् संचारण करत राहील. हादेखील मातेनेच दिलेला आदेश आहे.

### २) ब्रह्मचाऱ्यांची एक नवीन व्यवस्था - कर्म

भक्ती जर कर्मामध्ये रूपांतरित झाली नाही तर, ती मृत आणि निष्प्रभ ठरेल. (असे होऊ नये म्हणून) भारतमातेचे सेवाकार्य करायचे या हेतुने ज्यांनी सर्वसंगपरित्याग केलेला आहे अशा माणसांचा, मंदिराशी संलग्न असणाऱ्या कर्मयोग्यांचा आपला असा एक मठ असेल. या मठामध्ये एक नवी व्यवस्था असेल. काही जणांनी जर संन्यासी होण्याचे ठरविले असेल, तर ते पूर्णतया संन्यासी म्हणून जीवन व्यतीत करतील. अन्य बहुतेक जण हे ब्रह्मचारी म्हणून जीवन जगतील आणि जेव्हा त्यांना नेमून देण्यात आलेले कार्य पूर्ण होईल तेव्हा ते गृहस्थाश्रमामध्ये परततील; परंतु सर्वांनीच त्यागवृत्तीचा स्वीकार केला पाहिजे.

असे का? तर, त्याची दोन कारणे पुढीलप्रमाणे -

अ) कारण आपल्या शारीरिक इच्छाआकांक्षा, आपल्या इंद्रियांची तुष्टी, भौतिक जगामधील लालसा, अभिलाषा, आणि आळस यांमध्ये व्यग्र होण्यापासून आपण स्वतःला जेवढ्या प्रमाणात दूर ठेवू शकू, तेवढ्या प्रमाणातच आपण आपल्या अंतरंगामध्ये असणाऱ्या आध्यात्मिक शक्तींच्या महासागराकडे परतू शकणार आहोत.

ब) शक्तीच्या विकसनासाठी संपूर्ण एकाग्रतेची आवश्यकता असते; भाला जसा त्याच्या लक्ष्याच्या निशाणीवर अचूकपणे फेकला जातो, त्याचप्रमाणे मन हे पूर्णपणे त्याच्या लक्ष्यावर केंद्रित झालेले असले पाहिजे. इतर चिंता, काळज्या आणि मनोकामना या गोष्टींमुळे मन जर विचलित झाले तर, तो (मनरूपी) भाला त्याच्या सरळ मार्गापासून विचलित होईल आणि त्याचे लक्ष्य हरवून बसेल. ज्यांच्यामध्ये शक्ती कमाल मर्यादेपर्यंत विकसित झाली आहे, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक अंगामध्ये शक्ती ठासून भरलेली आहे आणि ही भूमी सुपीक करण्यासाठी जी आता ओसंडून वाहत आहे अशा शक्तीने सळसळणाऱ्या माणसांचे

एक केंद्र असणे आवश्यक आहे. ज्यांच्या अंतःकरणामध्ये आणि ज्यांच्या मेंदुमध्ये भवानी भारतीचा अग्नी प्रज्वलित झालेला आहे अशी ही मंडळी आपल्या भारतभूमीच्या कानाकोपऱ्यापर्यंत ही तेवती मशाल घेऊन जातील.

### ३) एक महान संदेश - ज्ञान

भक्ती आणि कर्म जर, ज्ञानावर अधिष्ठित नसतील तर, त्या गोष्टी परिपूर्ण आणि चिरकालीन ठरू शकणार नाहीत.

आपले जीव ज्ञानसंपन्न कसे करायचे आणि त्या ज्ञानरूपी शिळेच्या आधारावर, आपले कार्य सुप्रतिष्ठित कसे करायचे हे या नवीन व्यवस्थेतील ब्रह्मचाऱ्यांना शिकविण्यात येईल. त्यांच्या ज्ञानाचा आधार काय असेल? त्यास वेदान्तातील शक्तिशाली सिद्धान्तरूप असणाऱ्या महान सोऽहम् अशा मंत्राखेरीज अन्य कोणता आधार असणार? हे असे एक प्राचीन सत्य आहे की, जे अजूनपर्यंत राष्ट्राच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचलेले नाही. हे असे ज्ञान आहे की, जेव्हा ते कर्म व भक्ती यांच्या साहाय्याने सक्रिय केले जाते तेव्हा, ते मनुष्याला सर्व प्रकारच्या भीतीपासून आणि दुर्बलतेपासून मुक्त करते. स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।

### मातेचा संदेश

ही भवानी माता म्हणजे कोण असे जेव्हा तुम्ही विचाराल, तेव्हा ती स्वतःच तुम्हाला उत्तर देईल की, “मी एक अशी अनंत ऊर्जा आहे की, जी त्या शाश्वतापासून या जगामध्ये आणि तुमच्यामध्ये प्रवाहित झाली आहे. मी या विश्वाची माता आहे, मी जगज्जननी आहे आणि या पवित्र भूमीची, आर्यभूमीची जी तुम्ही सर्व लेकरे आहात, ज्यांची घडण तिच्या मातीपासून झाली आहे तसेच तिच्या सूर्याने आणि वायूने ज्यांचे पालनपोषण केले आहे अशा तुमच्यासाठी, मी ‘भवानी भारती’, ‘भारतमाता’ आहे.”

मग तुम्ही तिला जर असे विचाराल की, आम्ही भवानी मातेचे मंदिर स्थापन का करायचे, तर त्यावरील तिचे उत्तर ऐका. ती म्हणते, “कारण मीच तशी आज्ञा दिली आहे. आणि अशा रितीने तुम्ही भावी धर्मासाठी

एक केंद्र स्थापन करणार असल्यामुळे, तुम्ही त्या शाश्वताची इच्छा त्वरित अंमलात आणणार आहात आणि त्याद्वारे अशा एका गुणवत्तेचा संचय करणार आहात की, जी गुणवत्ता तुम्हाला या जीवनात बलशाली आणि पुढील जन्मामध्ये महान बनवेल. तुम्ही एका राष्ट्राच्या निर्मितीसाठी साहाय्य करत आहात, तुम्ही एका युगाचे संघटन करत आहात, हे जग आर्यमय करण्यासाठी तुम्ही साहाय्य करत आहात. आणि हे राष्ट्र तुमचे स्वतःचे राष्ट्र आहे, हे युग तुमचे आणि तुमच्या मुलाबाळांचे आहे; हे जग म्हणजे समुद्र आणि पर्वतांनी वेढलेला केवळ एखादा जमिनीचा तुकडा नाही, तर हे जग म्हणजे गजबजलेल्या लाखो लोकांचे निवासस्थान असणारी अखिल पृथ्वी आहे, ती नानारत्नवसुंधरा आहे.”

चला तर मग, आपल्या मातेची साद ऐका. ती आपल्या हृदयांमध्ये आधीपासूनच उपस्थित आहे; मात्र (आपल्या उपासनेनंतरच ती प्रकट होऊ शकणार आहे म्हणून) तिची उपासना केली जावी याची व तद्पश्चात होणाऱ्या प्रकटीकरणाची ती वाट पाहत आहे. सद्यस्थितीत ती कार्यरत नाही कारण आपल्या अंतरंगातील ‘ईश्वर’ तामसिकतेने झाकला गेला आहे, ती अशी अक्रिय झाल्याने तो चिंतित आहे, तो व्यथित आहे कारण तिने मदतीसाठी धावून यावे म्हणून तिची लेकरं तिला आवाहन करणार नाहीयेत.

(परंतु तुम्ही मात्र म्हणजे) ज्यांचे हृदय तिच्यासाठी हेलावून जात आहे असे तुम्ही सारे, तुमच्यातील ‘मी’चा काळा पडदा हटवा, तुम्हाला बंदिवान करणाऱ्या आळशीपणाच्या भिंती पाडून टाका आणि तुम्हाला जशी प्रेरणा होईल त्या पद्धतीने तुम्ही तिच्या साहाय्यासाठी धावून जा; तुम्ही तुमच्या देहानिशी, किंवा तुमच्या बुद्धीनिशी, तुमच्या वाणीच्या साहाय्याने किंवा तुमच्या संपत्तीच्या साहाय्याने, अथवा तुमच्या प्रार्थनेच्या व उपासनेद्वारे तिच्या हाकेस धावून जा; प्रत्येक जण ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार तिच्या साहाय्यास धावून जाईल.

आता मागे हटू नका, कारण ज्यांना हाक देण्यात आली होती,

पण ज्यांनी त्या हाकेकडे दुर्लक्ष केले त्यांना, तिच्या आगमनाच्या दिवशी कदाचित तिच्या रोषास सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे; परंतु ज्यांनी तिच्या आगमनासाठी थोडाफार का होईना, हातभार लावला होता त्यांच्यासाठी सौंदर्य आणि दयार्द्र दृष्टीने, भवानी मातेचे वदन किती उजळलेले असेल, याची कल्पना करा!

**

# आचारसंहिता

संन्यासी लोकांची जी नवीन संघटना असेल त्यामधील त्यांचे कार्य आणि नियम सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे असतील.

**सर्वसाधारण नियम**

१) भवानीमातेसाठी जे ब्रह्मचाऱ्याचे जीवन स्वीकारतील, त्यांना चार वर्षे तिच्या सेवेमध्ये व्यतीत करण्याचे व्रत स्वीकारावे लागेल. आणि त्या चार वर्षांनंतर, कार्य पुढे चालू ठेवायचे की कौटुंबिक जीवनाकडे परतायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य त्यांना असेल.

२) भवानीमातेच्या नावाने जमा झालेली रक्कम ही तिच्या सेवेमध्येच खर्च झाली पाहिजे.

या कार्यकर्त्यांना आवश्यकतेनुसार अन्न आणि निवारा पुरविला जाईल, परंतु याव्यतिरिक्त त्यांना काही मिळणार नाही.

३) कार्यकर्ते स्वतःसाठी म्हणून जी कमाई करतील, उदा. पुस्तकांच्या प्रकाशनादी गोष्टीमधून त्यांना जो पैसा मिळेल, त्यातील निम्मी रक्कम त्यांनी भवानी मातेच्या सेवेसाठी अर्पण करणे अपेक्षित आहे.

४) या कार्यकर्त्यांना संघटनेच्या प्रमुखाच्या, तसेच त्याच्या धार्मिक जीवनाशी व कार्याशी संबंधित असणाऱ्या त्याच्या एक किंवा दोन साहाय्यकांच्या आदेशांचे पूर्णतः पालन करावे लागेल.

५) संघटनेच्या प्रमुखाने नेमून दिलेली जी शिस्त असेल, तसेच आचाराचे आणि शारीरिक व मानसिक शुद्धीचे जे नियम असतील त्यांचे कार्यकर्त्यांनी कठोरपणे पालन केले पाहिजे.

६) कार्यकर्त्यांना त्यांच्या धार्मिक प्रगतीसाठी किंवा विश्रामासाठी काही कालावधी देण्यात येईल; त्या काळामध्ये ते मठामध्ये राहू शकतील, परंतु वर्षाच्या अधिकतर कालावधीमध्ये त्यांनी बाहेर राहून कार्य करणे अपेक्षित आहे.

मंदिराच्या सेवेकऱ्यांखेरीज आणि कार्याला मध्यवर्ती दिशा देण्याच्या दृष्टीने आवश्याक असतील अशा काही मोजक्या व्यक्तींखेरीज

इतर सर्वांना हा नियम लागू पडेल.

७) कार्यकत्यांमध्ये कोणतीही श्रेणीबद्ध रचना असणार नाही, सर्वजण समान असतील. स्वतःच्या प्रसिद्धीची किंवा विशेष सन्मानाची अपेक्षा कोणीही बाळगता कामा नये. त्यांनी सामर्थ्य आणि आत्मविलोपनाचा (self-effacement) अभ्यास केला पाहिजे.

**जनसेवा**

८) लोकप्रबोधन आणि गरीब व अशिक्षित लोकांना साहाय्य करणे हे कार्यकर्त्यांचे मुख्य कार्य असेल.

९) हे कार्य पुढील प्रकारे करता येईल -

अ) अशिक्षित लोकांना समजतील अशा पद्धतीने व्याख्याने देणे आणि प्रात्यक्षिके दाखविणे.

ब) रात्रशाळा आणि वर्ग चालविणे

क) धार्मिक शिकवण देणे

ड) रुग्णसेवा करणे

ई) परोपकाराच्या कार्यांचे आयोजन करणे

फ) या व्यतिरिक्त, त्यांना जे सत्कार्य वाटते आणि ज्याला संघटना संमती देईल अशी कामे करणे.

**मध्यमवर्गीयांसाठीचे कार्य**

१०) कार्यकर्त्यांना निर्देशित केले जाईल त्याप्रमाणे, त्यांनी मोठमोठ्या शहरांमध्ये आणि इतरत्र सार्वजनिक हिताची विविध कार्यं, विशेषतः शिक्षण व धार्मिक जीवनासंबंधित असणारी कार्यं आणि मध्यमवर्गाच्या प्रबोधनाच्या दृष्टीने उपयुक्त अशी कार्यं, तसेच लोकांच्या आवश्यकतेनुसार गरजेची असणारी इतर कार्यं हाती घेणे अपेक्षित आहे.

**सधन वर्गासाठी करायचे कार्य**

११) कार्यकर्ते जमीनदार, भूमिधारक आणि सधन व्यक्तींशी संपर्क साधतील आणि पुढील गोष्टी करण्याचा प्रयत्न करतील -

अ) जमिनदारांमध्ये सहानुभूतीची वृत्ती वाढीस लावणे आणि जमिनदार व कष्टकरी यांच्यामधील सर्व तंटेबखेडे मिटविणे.

ब) समाजातील सर्व वर्गांमध्ये एक समान व चैतन्यमय धार्मिक बंध निर्माण होईल आणि एकाच महान आदर्शाभोवती त्या सर्वांमध्ये एक सामायिक भाववृत्ती निर्माण होईल हे पाहणे, हे कार्यकर्त्यांचे काम आहे.

क) या कार्यकर्त्यांनी त्यांच्या परिसरामधील लोकहिताच्या आणि परोपकाराच्या कार्याकडे सधन व्यक्तींचे मन वळविले पाहिजे, आणि हे करत असताना त्या सधन व्यक्तींच्या मनामध्ये कोणत्याही पुरस्काराची किंवा सरकारी मानसन्मानाची अपेक्षा निर्माण होणार नाही याची दक्षता या कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे.

**देशासाठी सर्वसाधारण कार्य**

१२) जेव्हा पुरेसा धनसंचय होईल तेव्हा, अर्थ-निर्माणक कला आणि उत्पादनाच्या अभ्यासासाठी काही कार्यकर्त्यांना परदेशामध्ये पाठविले जाईल.

१३) अभ्यासाच्या कालावधीमध्ये तेथेही त्यांनी संन्याशाप्रमाणे जीवन व्यतीत करणे अपेक्षित असेल. त्यांना ब्रह्मचर्याच्या आणि परित्यागाच्या सवयींचे विस्मरण होता कामा नये.

१४) भारतामध्ये परतल्यानंतर त्यांनी, संन्याशाप्रमाणे जीवन व्यतीत करून, संघटनेच्या साहाय्याने कारखाने व कार्यशाळा स्थापन कराव्यात. आणि त्यातून होणारा आर्थिक लाभ हा अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्यावर खर्च करण्यात यावा.

१५) इतरांना विविध देशांमध्ये पायी प्रवास करण्यासाठी पाठविण्यात येईल. त्यांनी आपल्या जीवनाच्या, आचरणाच्या आणि संवादाच्या आधारे, युरोपीयन राष्ट्रांमध्ये भारतीय लोकांबद्दल एक प्रकारची सहानुभूतीची आणि प्रेमाची भावना वाढीस लावणे आणि त्यायोगे आर्य आदर्शांबद्दलची स्वीकारक्षमता वाढीस लावण्याचा मार्ग तयार करणे, अपेक्षित आहे.

मंदिराची उभारणी झाल्यानंतर आणि त्यामध्ये भवानी मातेची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर, लोकांकडून जेवढ्या प्रमाणात सहकार्य व अनुमोदन लाभू शकेल तेवढ्या प्रमाणात, संघटनेचे कार्य शक्य तितक्या त्वरेने करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला जाईल.

मातेच्या कृपाशीर्वादामुळे आपल्याला या कार्यामध्ये निश्चितपणे यश प्राप्त होईल.

**

# वन्दे मातरम्

# वन्दे मातरम्

सुजलां सुफलां मलयज-शीतलाम्
शस्य-श्यामलां मातरम् ॥

शुभ्र-ज्योत्स्ना-पुलकित-यामिनीम्
फुल्ल-कुसुमित-द्रुमदल-शोभिनीम्,
सुहासिनीं सुमधुर-भाषिणीम्,
सुखदां वरदां मातरम् ॥

सप्तकोटि-कण्ठ-कलकल-निनाद-कराले,
द्विसप्तकोटि-भुजैधृत-खरकरवाले,
अबला केन मा एत बले !

बहुबल-धारिणीं नमामि तारिणीम्
रिपुदल-वारिणीं मातरम् ॥

तुमि विद्या तुमि धर्म,
तुमि हृदि तुमि मर्म,
त्वं हि प्राणाः शरीरे ।
बाहुते तुमि मा शक्ति,
हृदये तुमि मा भक्ति,
तोमारइ प्रतिमा गड़ि मन्दिरे मन्दिरे ।

त्वं हि दुर्गा दशप्रहरण-धारिणी
कमला कमल-दल-विहारिणी
वाणी विद्यादायिनी नमामि त्वाम्

नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्,
वन्दे मातरम् ।

श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम् ।।

- ऋषी बंकिम चंद्र चट्टोपाध्याय

**

(मुळात बंगाली भाषेत असलेल्या 'वंदे मातरम्' या गीताचा श्री. अरविंद घोष यांनी इंग्रजीमध्ये गद्यानुवाद केला आहे. तो पुढीलप्रमाणे...)

I bow to thee, Mother,
richly-watered, richly-fruited,
cool with the winds of the south,
dark with the crops of the harvests, the Mother!
Her nights rejoicing in the glory of the moonlight,
her lands clothed beautifully with her trees in flowering bloom,
sweet of laughter, sweet of speech,
the Mother, giver of boons, giver of bliss!

Terrible with the clamorous shout of seventy million throats,
and the sharpness of swords raised in twice seventy million hands,
who sayeth to thee, Mother, that thou art weak?
Holder of multitudinous strength,
I bow to her who saves,
to her who drives from her the armies of her foemen, the Mother!

Thou art knowledge, thou art conduct,
thou our heart, thou our soul,
for thou art the life in our body.
In the arm thou art might, O Mother,

in the heart, O Mother, thou art love and faith,
it is thy image we raise in every temple.

For thou art Durga holding her ten weapons of war,
Kamala at play in the lotuses
and Speech, the goddess, giver of all lore,
to thee I bow!
I bow to thee, goddess of wealth,
pure and peerless,
richly-watered, richly-fruited,
the Mother!
I bow to thee, Mother,
dark-hued, candid,
sweetly smiling, jewelled and adorned,
the holder of wealth, the lady of plenty,
the Mother!

- Sri Aurobindo

**

(मुळात बंगाली भाषेत असलेल्या ‘वंदे मातरम्’ या गीताचा श्री. अरविंद घोष यांनी इंग्रजीमध्ये गद्यानुवाद केला आहे. त्याचा हा मराठी अनुवाद...)

हे माते, मी तुला वंदन करत आहे.
जलसमृद्ध आणि धनधान्यसमृद्ध असणाऱ्या हे माते,
दक्षिणवाऱ्यांमुळे तू शीतलतनू झाली आहेस;
सुगीच्या पिकांनी घनगर्द झालेल्या हे माते,
मी तुला वंदन करत आहे.
चंद्रप्रकाशाच्या वैभवामध्ये तुझ्या रात्री न्हाऊन निघाल्या आहेत,
विविध फुलांनी बहरलेले वृक्षरूपी सुंदर वस्त्र
तुझ्या भूमीने परिधान केले आहे,
तुझे हास्य मंजुळ आहे आणि तुझी वाणी मधुर आहे,
परमानंदप्रदायिनी, वरदायिनी असणाऱ्या हे माते,
मी तुला वंदन करत आहे.

सप्त कोटी मुखांमधून उठणाऱ्या गर्जनांनी
आणि सप्त कोटी प्रजाजनांच्या
दोन्ही हातांमध्ये उगारलेल्या शस्त्रांमुळे
तू रुद्रभीषण दिसत आहेस, तेव्हा हे माते,
तू दुर्बल आहेस असे म्हणण्याचे धारिष्ट्य कोण बरे करेल?
अपरिमित शक्ती धारण करणाऱ्या रक्षणकर्त्या मातेसमोर,
आणि शत्रूंच्या पलटणी पळवून लावणाऱ्या मातेसमोर
मी नतमस्तक आहे. हे माते, मी तुला वंदन करत आहे.

तूच ज्ञान आहेस आणि तूच आमचा स्वधर्म आहेस,
तूच आमच्या हृदयांमध्ये निवास करत आहेस.

तूच आमचा आत्मा आहेस आणि
आमच्या देहामधील प्राणही तूच आहेस.
आमच्या बाहुंमधील शक्तिसामर्थ्य तूच आहेस,
आमच्या हृदयामधील प्रेम आणि श्रद्धादेखील तूच आहेस,
आम्ही सर्व मंदिरांमध्ये तुझ्याच मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करत असतो.
कारण तू युद्ध-शस्त्रे धारण केलेली दशभुजा दुर्गा आहेस,
आणि कमलपुष्पांमध्ये विहरणारी सौंदर्यदेवतादेखील तूच आहेस.
परावाणीरूप असणाऱ्या, वेदप्रदायिनी देवते,
मी तुला वंदन करत आहे.

हे ऐश्वर्यदेवते,
विशुद्ध व अनुपम जलप्रवाहांनी आणि
फुलाफळांनी समृद्ध असणाऱ्या हे माते,
मी तुला वंदन करत आहे.
श्यामलवर्णी, ऋजुस्वभावी, सुहास्यवदन असणाऱ्या,
आभूषणं परिधान केलेल्या, शृंगाराने विनटलेल्या,
वैभवधारिणी हे माते,
वैविध्यसंपन्न हे माते, मी तुला वंदन करत आहे.

**

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे